शब्दांना सत्याची धार
# प्रहार
RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED
मुंबई ● गुरुवार, २५ डिसेंबर २०२५
मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध ● वर्ष २२ ● अंक ७७ ● पाने १० ● ₹ ५.००
www.prahaar.in epaper.prahaar.in



प्रभादेवीतील प्रभाग १९४ मनसेला सोडण्यास 'उबाठा'चा विरोध
पान : महामुंबई

नाताळच्या शुभेच्छा



बुधवारचा दिवस 'स्फोटक' खेळीनेच गाजला!
पान : क्रीडा

## वेचक

### नाताळ, नववर्षानिमित्त राज्यपालांच्या शुभेच्छा

**मुंबई :** महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी नाताळ तसेच नववर्षानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. जगातील अनेक देशांमध्ये साजरा केला जाणारा नाताळचा सण भगवान येशू ख्रिस्तांच्या जीवन कार्याचे स्मरण करून देतो. त्यांचा जन्मोत्सव असलेला हा सण जगात शांतता तसेच मनामनात सामंजस्य व सद्भावना निर्माण करण्यास सहाय्यभूत ठरेल, असा विश्वास वाटतो. सर्वांना नाताळ तसेच आगामी नववर्ष २०२६ निमित्त हार्दिक शुभेच्छा देतो, असे राज्यपाल देवव्रत यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटले आहे.

### भारतीयांसाठी 'चायना ऑनलाइन व्हिसा'

**नवी दिल्ली :** दिल्लीतील चिनी दूतावासाने भारतीय नागरिकांसाठी ऑनलाइन व्हिसा सेवा सुरू केली असून, यासाठी 'चायना ऑनलाइन व्हिसा ॲप्लिकेशन सिस्टीम' कार्यान्वित करण्यात आली आहे. या नव्या प्रणालीमुळे आता व्हिसासाठी कागदपत्रे सादर करण्याची तसेच वारंवार दूतावासात प्रत्यक्ष भेट देण्याची गरज राहणार नाही. नव्या प्रणालीअंतर्गत अर्जदारांना 'व्हिसा फॉर चायना' या अधिकृत वेबसाइटवर जाऊन ऑनलाइन अर्ज भरावा लागेल आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी लागतील. ही सुविधा पर्यटक, व्यावसायिक, विद्यार्थी तसेच व्हिसासाठी उपलब्ध असणार आहेत. संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन असल्याने, दूतावासात प्रत्यक्ष उपस्थिती केवळ बायोमेट्रिक पडताळणीसाठीच आवश्यक असेल.



**सोन्याचा भाव**
२४ कॅरेट प्रति तोळा १३८९३० रुपये
२२ कॅरेट प्रति तोळा १२७३५० रुपये



**चांदीचा भाव**
प्रति किलो २३३००० रुपये



**अखेरच्या सत्रात शेअर बाजारात घसरण झाली आहे. अस्थिरतेचा फटका बसल्याने अखेरच्या सत्रात सकाळची तेजी घसरणीत बदलली आहे. सेन्सेक्स ११६.१४ अंकाने व निफ्टी ३५.०५ अंकाने घसरला आहे. सेन्सेक्स व निफ्टी बँक निर्देशांकातही घसरण बदलल्याने बाजाराची सपोर्ट लेवल नष्ट झाली. क्षेत्रीय निर्देशांकात मिडकॅप व स्मॉलकॅपसह आज आयटी, मीडिया, पीएसयू बँक, तेल व गॅस शेअर्समध्ये मोठी घसरण झाली असून वाढ मीडिया, रिअल्टी, मेटल शेअर्समध्ये कायम राहिली. मोठ्या दिग्गज कंपन्यापैकी एचडीएफसी बँक, रिलायन्स इंडस्ट्रीज, आयसीआयसीआय बँक, अदानी एंटरप्राईजेस, एचडीएफसी लाईफ इन्शुरन्स यांसारख्या शेअर्समध्ये घसरण झाली असून एक्सिस बँक, आयडीबीआय, मारुती सुझुकी, टीसीएस शेअर्समध्ये वाढ झाली आहे.**

# बहुप्रतिक्षित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आजपासून उड्डाणे!

◆ **नवी मुंबई (प्रतिनिधी):**

बहुप्रतिक्षित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ गुरुवारपासून म्हणजेच २५ डिसेंबर २०२५ रोजी अधिकृतपणे कार्यान्वित होणार आहे. यामुळे नवी मुंबई शहराची ओळख देशाच्या आणि विकसित राष्ट्रांच्या प्रवेशद्वारासारखी होणार आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आणि विविध समस्यांवर मात करून नवी मुंबई विमानतळाचे हे महत्त्वाकांशी प्रकल्प पूर्णत्वास आले आहे. बंगळूरुहून येणाऱ्या पहिल्या व्यावसायिक विमानाचे लँडिंग नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर होणार आहे. पहिल्याच दिवशी ४ हजारांहून अधिक प्रवासी प्रवास करणार असून, गोवा, कोची, दिल्ली आणि हैदराबाद या प्रमुख शहरांसाठी विमानसेवा सुरू होणार आहे.

या विमानतळावर पहिल्या टप्प्यात दररोज ३० 'फ्लाइट अप-डाऊन' होतील, असे सांगण्यात आले.



## ९ कोटी प्रवाशांसाठी विमानतळ सज्ज

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला २००७ मध्ये डीजीसीएकडून मान्यता मिळाली होती. त्यानंतर पर्यावरणीय अडथळे, जमीन संपादन, पुनर्वसन, कायदेशीर आणि तांत्रिक समस्यांचे मोठे आव्हान होते. पण या सर्व समस्यांवर मात करून विमानतळाचे काम पूर्ण झाले आहे. दीर्घकाळ चाललेल्या या प्रक्रियेनंतर विमानतळाचे स्वप्न प्रत्यक्षात उतरल्याने नवी मुंबईसह संपूर्ण राज्यासाठी हा ऐतिहासिक क्षण मानला जात आहे. वार्षिक नऊ कोटी प्रवासी हाताळण्याची या विमानतळाची क्षमता आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील भार मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. यामुळे मुंबई महानगर क्षेत्रात आता दोन आंतरराष्ट्रीय विमानतळ उपलब्ध होणार असून, हवाई वाहतूक अधिक सुलभ आणि गतिमान होईल.

नवी मुंबई विमानतळ सुरू झाल्याने उद्योग-व्यवसाय, आयटी, लॉजिस्टिक्स, पर्यटन आणि सेवा क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. विमानतळालगत मोठ्या प्रमाणात एरोसिटी (Aero City) विकसित होणार असून, त्यामुळे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील आणि नवी मुंबईचा आर्थिक चेहरा पूर्णपणे बदलण्याची शक्यता आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची सुरुवात ही केवळ वाहतुकीची सुविधा नसून, विकासाचा नवा अध्याय आहे. उद्यापासून सुरु होणाऱ्या विमानसेवांमुळे नवी मुंबई देशाच्या नकाशावर अधिक ठळकपणे अधोरेखित होणार असून, 'विकसित भारता'कडे नेणाऱ्या प्रवासात हा विमानतळ महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# 'जणू रशिया-युक्रेन एकत्र आलेत...'

## ठाकरे बंधूंच्या युतीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सणसणीत टोला

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**




काही प्रसारमाध्यमे हे दृश्य असे दाखवत आहेत की जणू रशिया आणि युक्रेनची युती होत आहे. एकीकडून पुतीन आणि दुसरीकडून झेलेन्स्की निघाले आहेत, असे चित्र उभे केले जात आहे. मात्र, ही युती केवळ स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी दोन पक्ष एकत्र आलेले आहेत. ठाकरे बंधू म्हणजे मुंबई किंवा मराठी नाही, अशी खिल्ली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उडवली. ही युती प्रीतिसंगम नव्हे, तर भीतीसंगम आहे. ठाकरे बंधू म्हणजे मुंबई किंवा मराठी माणूस नाही. त्यांचा ट्रॅक रेकॉर्ड भ्रष्टाचाराचा असल्याने महायुतीवर कोणताही परिणाम होणार नाही, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उबाठा आणि मनसेची अधिकृत युती जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी या युतीवर खोचक टीका केली. "ही युती म्हणजे दोन अस्तित्वहीन पक्षांनी स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी केलेली केविलवाणी धडपड आहे. काही प्रसारमाध्यमे हे दृश्य जणू रशिया आणि युक्रेनची युती होत आहे, पुतीन आणि झेलेन्स्की एकत्र येत आहेत असे चित्र उभे करत आहेत; परंतु कुठल्याही पक्षाला निवडणुकीत अस्तित्व टिकवण्यासाठी जे करावे लागते, ते या दोन पक्षांनी केले आहे. या पलीकडे याचा दुसरा अर्थ काढण्याचे कारण नाही. या युतीमुळे महायुतीवर कोणताही परिणाम होणार नाही. ठाकरे बंधू एकत्र आले याचा मला आनंद आहे, पण यामुळे राजकीयदृष्ट्या मोठे फेरबदल होतील असा समज बाळगणे बाळबोधपणा आहे", असे मुख्यमंत्री म्हणाले.

मंत्रालयात माध्यमांशी संवाद साधताना फडणवीस म्हणाले, "उबाठाने मुंबईकरांचा सातत्याने विश्वासघात केला आहे. मराठी माणसाला मुंबईबाहेर घालवण्याचे पाप त्यांनी केले. अमराठींवर हल्ले केले, त्यामुळे तेही त्यांच्यासोबत नाहीत. मुंबईत कोणीही ठाकरे बंधूंसोबत येणार नाही. त्यांचा ट्रॅक रेकॉर्ड फक्त भ्रष्टाचार आणि स्वहिताचा आहे. निवडणुका आल्या की भावनिक बोलतात, पण आता जनता त्यांना भुलणार नाही. मुंबईकरांनी महायुतीने केलेला विकास पाहिला आहे. विशेषतः मराठी माणसाला मुंबईत हक्काची घरे देण्याचा कार्यक्रम आम्ही हाती घेतला आहे. त्यामुळे मुंबईची जनता विकासावर महायुतीलाच कौल देईल."

### पलटी मारणाऱ्यांनी आम्हाला हिंदुत्व शिकवू नये

हिंदुत्वाच्या मुद्द्यावरही फडणवीसांनी ठाकरेंना लक्ष्य केले. "मी हिंदुत्वात जन्मलो आणि हिंदुत्वातच मरेन. मतांसाठी भगवी शाल घालणारे, रोज मत बदलणारे आम्ही नाही. मुंबई-महाराष्ट्र हिंदुत्ववादी आहे. जे हिंदुत्व सोडतील, लांगुलचालन करतील त्यांची अवस्था विधानसभेत दिसली आहे. आमचे हिंदुत्व व्यापक आहे, भारतीय जीवनपद्धतीवर आधारित आहे. प्रभू श्रीरामांना मानणाऱ्यांना आम्ही सोबत घेतो, त्यांची जात-धर्म पाहत नाही. पलटी मारणाऱ्यांनी आम्हाला हिंदुत्व शिकवू नये," असा घणाघात त्यांनी केला.

## मनसे -उबाठा युतीची अखेर घोषणा

**मुंबई :** उबाठा आणि मनसेची अधिकृतरीत्या युतीची घोषणा बुधवारी वरळी सी-फेसजवळील ब्लू सी हॉटेलमध्ये करण्यात आली. मुंबईचा महापौर हा मराठीच होणार आणि तो आमचाच होणार, असेही मनसे अध्यक्ष राज ठाकरे म्हणाले. जे काही बाकी बोलायचे आहे, जाहीर सभा सुरु होतील तेव्हा बोलू. परंतु माझी एक मुलाखत झाली होती, त्या मुलाखतीत मी म्हटलं होतं, कुठल्याही वादापेक्षा आणि भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. मला वाटते तिथून त्या वाक्यापासून एकत्र येण्याची सुरुवात झाली, असेही राज यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. मुंबई महापालिकेत युती झाली असली तरी, स्थानिक पातळीवरील पदाधिकारी चर्चा करून युतीची घोषणा करतील, असेही राज यांनी स्पष्ट केले.

# दोन नव्या विमान कंपन्यांना केंद्र सरकारची मंजुरी

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

## 'इंडिगो'च्या एकाधिकारशाहीला ब्रेक




जेव्हा देशातील सर्वात मोठी विमान कंपनी इंडिगोची व्यवस्था कोलमडली, तेव्हा हजारो प्रवाशांना विमानतळांवर तासनतास वाट पाहावी लागली. अनेकांना त्यांच्या गंतव्यस्थानावर पोहोचता आले नाही. या संकटाने एक कठोर वास्तव उघड केले. देशाच्या विमान वाहतूक क्षेत्र इंडिगोच्या एकाधिकारशाहीमुळे ही परिस्थिती उद्भवली. अशातच आता भारतीय विमान वाहतूक क्षेत्रात स्पर्धा वाढवण्यासाठी केंद्र सरकारने दोन नवीन विमान कंपन्यांना मंजुरी दिली आहे.

नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने केरळ येथील अल हिंद एअर आणि हैदराबाद येथील फ्लाय एक्स्प्रेस या दोन नवीन विमान कंपन्यांना 'नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट' (एनओसी) जारी केले आहे. यामुळे इंडिगो आणि एअर इंडियाच्या वर्चस्वाला आव्हान मिळणार असून, प्रवाशांना अधिक पर्याय आणि स्वस्त तिकीट दर मिळण्याची शक्यता आहे. अल हिंद एअर ही अलहिंद ग्रुपची कंपनी असून, ती पर्यटन आणि प्रवास क्षेत्रात कार्यरत आहे, तर फ्लाय एक्स्प्रेस ही कुरियर आणि कार्गो सेवेत असलेली कंपनी आहे. यादी उत्तर प्रदेशातील शंख एअरला एनओसी मिळाली असून, तीही लवकरच सेवा सुरू करणार आहे. केंद्र सरकारने ही मक्तेदारी मोडून प्रवाशांना चांगले पर्याय उपलब्ध करून देण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले आहे.

सध्या भारतीय हवाई क्षेत्रात दोन प्रमुख कंपन्यांचे वर्चस्व आहे. इंडिगो आणि टाटा ग्रुप (एअर इंडिया). आकडेवारी दर्शवते की सुमारे ९०% देशांतर्गत प्रवासी या दोन्ही कंपन्यांच्या सेवा वापरतात. म्हणूनच, जेव्हा एका एअरलाइनला समस्या येते तेव्हा संपूर्ण व्यवस्था विस्कळीत होते आणि सामान्य माणसाला त्याचा फटका सहन करावा लागतो. हा धोका कमी करण्यासाठी, नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी कारवाई केली आहे.

याबाबत नायडू सांगितले की, 'बाजारात निरोगी स्पर्धा निर्माण करण्यासाठी सरकार नवीन विमान कंपन्यांना प्रोत्साहन देत आहे. गेल्या आठवड्यात मंत्रालयाने तीन नवीन कंपन्यांच्या टीमशी बैठक घेतली आहे.' मंत्र्यांच्या या पावलावरून स्पष्ट होते की, सरकार आता मनमानी भाडे आणि विलंबापासून जनतेला दिलासा देण्यासाठी बाजारात नवीन पर्याय निर्माण करू इच्छित आहे. ज्या दोन कंपन्यांना हिरवा कंदील मिळाला आहे, त्यांची पार्श्वभूमी मनोरंजक आहे.

# भारताचे अंतराळवीर चंद्रावर जाणार

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

आर्यभट्ट या पहिल्या भारतीय उपग्रहाच्या प्रक्षेपणापासून ते चांद्रयान ३ मोहीमेपर्यंत भारताने उपग्रह, प्रक्षेपण वाहने, वैज्ञानिक मोहिमांच्या माध्यमातून स्वतःची जागतिक ओळख निर्माण केली आहे. पुढील काळात भारत मानव अंतराळ मोहिमेच्या दिशेने वाटचाल करत असून गगनयान कार्यक्रमांतर्गत अंतराळवीरांना अवकाशात पाठवण्याची तयारी सुरू आहे. भारताचे स्वतःचे अंतराळ स्थानक २०३५ पर्यंत उभारण्याचे, तर २०४० पर्यंत भारतीय अंतराळवीरांना चंद्रावर उतरवण्याची योजना आखण्यात आली असल्याचे इस्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही. नारायण यांनी जाहीर केले.

# नगराध्यक्षांना मिळणार मतदानाचा अधिकार

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

राज्यात पार पडलेल्या नगर परिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत महायुतीला ऐतिहासिक विजय मिळाला. एकट्या भाजपने १२९ हून अधिक नगराध्यक्षपदे जिंकली. मात्र, जनतेतून थेट निवडून आलेले हे नगराध्यक्ष आतापर्यंत केवळ खुर्चीपुरते मर्यादित होते. त्यामुळे त्यांचे अधिकार वाढवण्यात आले असून, ते आता नगर परिषद आणि नगरपंचायतीचे सदस्यही राहू शकतील आणि बैठकीत मताचा अधिकारही त्यांना मिळणार आहे. हा बदल करण्यासाठी राज्य सरकारने बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करणारा अध्यादेश लवकरच काढला जाणार आहे.

### सुधारित अध्यादेश लवकरच काढणार

पूर्वी सदस्यांमधून निवडले जाणारे अध्यक्ष हे मूलतः सदस्य असत, त्यामुळे त्यांना आपोआप मतदानाचा अधिकार प्राप्त होत असतो; परंतु थेट जनतेने निवडलेले अध्यक्ष फक्त अध्यक्षपदी राहत असत, सदस्यत्व आणि मतदानाचा अधिकार त्यांना नव्हता. आता सरकारने हा भेद दूर करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या सुधारण्यानुसार, थेट निवडून आलेला नगराध्यक्ष हा आपोआप नगर परिषदेचा सदस्यही मानला जाईल. त्यामुळे तो अध्यक्ष म्हणून काम करतानाच सदस्य म्हणूनही बैठकीत भाग घेऊ शकेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, त्याला बैठकीत एक मत देण्याचा पूर्ण अधिकार मिळेल.

# एकनाथ शिंदे – गणेश नाईक यांच्यात मनोमिलन?

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

## मंत्रालयात बंद दाराआड चर्चा; नवी मुंबई पालिकेसह ठाण्यातील जागावाटपाचा तिढा सुटणार

महाराष्ट्राच्या राजकारणात ठाणे आणि नवी मुंबईतील सत्ता समीकरणे नेहमीच चर्चेचा विषय राहिली आहेत. विशेषतः एकनाथ शिंदे यांनी ठाण्याची कमान हाती घेतल्यापासून गणेश नाईक आणि शिंदे यांच्यात सुप्त संघर्ष सुरू झाला. नाईक मंत्री झाल्यानंतर त्यांनी सुरू केलेल्या जनता दरबारांनी या संघर्षाला व्यापक वळण मिळाले. मात्र, अचानक या दोन्ही नेत्यांनी मंत्रालयात बंद दाराआड चर्चा केल्याने त्यांचे मनोमिलन झाले की काय, अशा चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाल्या आहेत.

नवी मुंबई हा गणेश नाईक यांचा बालेकिल्ला मानला जातो. तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी येथे आपली राजकीय पकड मजबूत ठेवली आहे. दुसरीकडे, एकनाथ शिंदे यांनी गेल्या काही वर्षांत ठाण्यापलीकडे जात नवी मुंबईतही संघटनात्मक जाळे विणण्याचा प्रयत्न



सुरू केल्याने या दोन्ही नेत्यांमध्ये संघर्ष सुरू झाला. प्रभागरचना, विकासकामे, नगरसेवक फोडणे अशा अनेक मुद्द्यांवरून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या. दुसरे म्हणजे, मंत्रीपद मिळाल्यानंतर गणेश नाईक यांनी ठाण्यात जनता दरबार सुरू केला. शिंदे यांच्या प्रभावक्षेत्रात नाईकांनी जनता दरबार घेतल्याने, त्याकडे थेट आव्हान म्हणून पाहिले गेले. विशेषतः नवी मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर हा वाद तीव्र झाला होता.

अशात शिंदे आणि नाईक यांच्यात मंत्रालयात बंददाराआड १५ मिनिटांहून अधिक काळ चर्चा झाल्याने, ही भेट राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे. नवी मुंबई पालिकेची निवडणूक भाजप आणि शिवसेनेने महायुती म्हणून लढवावी, यावर दोन्ही नेत्यांचे बैठकीत एकमत झाल्याचे कळते. शिवाय जागावाटपाचा फॉर्म्युला देखील अंतिम झाला असून, ठाणे आणि पालघरमधील अन्य पालिकांबाबतही या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# अमेरिकेतील एच-१ बी व्हिसासाठी जुनी लॉटरी प्रणाली रद्द

◆ **वॉशिंग्टन (वृत्तसंस्था) :**

अमेरिकेतील डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने एच-१ बी वर्क व्हिसासाठी जुनी लॉटरी प्रणाली रद्द करण्याची घोषणा केली आहे. त्याऐवजी, अधिक कुशल आणि जास्त पगार असलेल्या परदेशी कामगारांना प्राधान्य देणारी एक नवीन "वेटेड सिलेक्शन" प्रणाली सुरू केली जाणार आहे. हा बदल अमेरिकन कामगारांचे पगार, नोकऱ्या आणि कामाच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी आहे. अमेरिकेच्या गृह सुरक्षा विभाग आणि यूएस नागरिकत्व आणि इमिग्रेशन सेवा यांनी मंगळवारी हा नवीन नियम जारी केला.

व्हिसा निवड आता रँडम नसून वेटेड असेल. निवड पगाराच्या पातळीनुसार केली जाईल. जास्त पगार असलेल्या नोकरीच्या ऑफर असलेल्या अर्जदारांना स्वीकारले जाण्याची शक्यता जास्त असेल. कामगार विभागाद्वारे चार वेतन स्तर निश्चित केले जातील. सर्वात कमी स्तरावर एक प्रवेश आणि सर्वोच्च स्तरावर चार प्रवेश यामुळे उच्च-पगारी आणि उच्च-कुशल कामगारांना फायदा होईल. वार्षिक मर्यादा समान राहील, एकूण ८५ हजार व्हिसाची (जनरलिस्टसाठी ६५ हजार + प्रगत पदवी असलेल्यांसाठी २० हजार). हा नियम २७ फेब्रुवारी २०२६ रोजी लागू होईल.


## 'बाहुबली' एलव्हीएम ३ द्वारे नवा कीर्तिमान प्रस्थापित

# इस्रोचा नवा विक्रम : अमेरिकेच्या 'ब्लूबर्ड-ब्लॉक-२' उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण

◆ **बंगळूरु (वृत्तसंस्था) :**

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) पुन्हा एकदा नवा कीर्तिमान प्रस्थापित केला आहे. इस्रोच्या 'बाहुबली' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एलव्हीएम ३ रॉकेटने अमेरिकेचा 'ब्लूबर्ड-ब्लॉक-२' हा उपग्रह यशस्वीपणे प्रक्षेपित केला. संभाव्य अवशेषांमुळे प्रक्षेपणात सुमारे ९० सेकंदांचा विलंब झाला होता.

ब्लूबर्ड-ब्लॉक-२ उपग्रहाचा उद्देश जगभरातील स्मार्टफोनना थेट उच्च-गती सेल्युलर ब्रॉडबँड सेवा उपलब्ध करून देणे हा असून, त्यामुळे जागतिक मोबाइल कनेक्टिव्हिटीला मोठी चालना मिळणार आहे. इस्रोने आज पुन्हा एक महत्त्वाचा टप्पा गाठला. भारताच्या जडवाहक एलव्हीएम ३- एम ६ रॉकेटचे प्रक्षेपण यशस्वी झाले. या व्यावसायिक मोहिमेअंतर्गत अमेरिकेच्या पुढील पिढीतील उपग्रहाला पृथ्वीच्या निम्न कक्षेत (लोअर अर्थ ऑर्बिट) स्थापित करण्यात आले. इस्रोकडून प्राप्त माहितीनुसार, हे प्रक्षेपण बुधवारी सकाळी ८.५४ वाजता सतीश धवन अंतराळ केंद्रातून होणार होते. मात्र, तांत्रिक कारणांमुळे त्यात ९० सेकंदांचा विलंब झाला. या मोहिमेद्वारे अमेरिकेच्या एएसटी स्पेसमोबाइल कंपनीचा ब्लूबर्ड-



ब्लॉक-२ अवकाशयान अंतराळात पाठवण्यात आला.

ब्लूबर्ड-ब्लॉक-२ हा आजपर्यंत एलव्हीएम ३ द्वारे लोअर अर्थ ऑर्बिटमध्ये पाठवण्यात आलेला सर्वात जड पेलोड आहे. या उपग्रहाचे वजन सुमारे ६,१०० किलोग्रॅम आहे. यापूर्वी हा विक्रम ४,४०० किलोग्रॅम वजनाच्या सीएमएस-०३ संप्रेषण उपग्रहाच्या नावावर होता, जो २ नोव्हेंबर रोजी प्रक्षेपित करण्यात आला होता. इस्रोची व्यावसायिक शाखा न्यू स्पेस इंडिया लिमिटेडने अमेरिकेच्या एएसटी स्पेसमोबाइल कंपनीसोबत करार केला होता. प्रक्षेपणानंतर सुमारे १५ मिनिटांत हा उपग्रह रॉकेटपासून वेगळा होईल आणि सुमारे ६०० किलोमीटर उंचीवरील लोअर अर्थ ऑर्बिटमध्ये स्थापित केला जाईल.

लाँच व्हेईकल मार्क-३ हे भारताचे सर्वात शक्तिशाली रॉकेट असून, त्यामुळेच त्याला 'बाहुबली' रॉकेट असेही संबोधले जाते. इसरोने स्पष्ट केले आहे की ६,१०० किलोग्रॅम वजनाचा हा उपग्रह एलव्हीएम ३ द्वारे लोअर अर्थ ऑर्बिटमध्ये प्रक्षेपित करण्यात आलेला आजवरचा सर्वात जड पेलोड आहे.ब्लूबर्ड-ब्लॉक-२ चे प्रक्षेपण इस्रोच्या व्यावसायिक शाखा न्यू स्पेस इंडिया लिमिटेड (एनसीआयएल)मार्फत करण्यात आले. यासाठी अमेरिकेच्या एएसटी स्पेसमोबाइल कंपनीने एनसीआयएलसोबत करार केला होता. ही मोहीम एलएसआयएल एनएसआयएल आणि अमेरिका-आधारित एएसटी स्पेसमोबाइल यांच्यातील व्यावसायिक करारांतर्गत राबवण्यात आली.

हा उपग्रह जगभरातील स्मार्टफोनना थेट उच्च-गती सेल्युलर ब्रॉडबँड सेवा देण्यासाठी डिझाइन करण्यात आला असून, तो मोबाइल कनेक्टिव्हिटीसाठी जागतिक एलईओ तारामंडलाचा एक भाग ठरणार आहे. एएसटी स्पेसमोबाइल ही अवकाश-आधारित पहिली सेल्युलर ब्रॉडबँड नेटवर्क प्रणाली विकसित करत असून, यामुळे स्मार्टफोन थेट उपग्रहांशी जोडले जातील. हे नेटवर्क जगातील कुठल्याही ठिकाणी ४ जी आणि ५ जी व्हॉईस व व्हिडीओ कॉल, मेसेजिंग, स्ट्रीमिंग आणि डेटा सेवा उपलब्ध करून देणार आहे.

# केरळमध्ये 'बर्ड फ्लू'चा प्रादुर्भाव

◆ **कोट्टायम (वृत्तसंस्था) :**

केरळमध्ये अलाप्पुझा आणि कोट्टायम जिल्ह्यांमध्ये एवियन इन्फ्लूएंजा म्हणजेच बर्ड फ्लूचा नवीन प्रकोप आढळून आला आहे. ही अत्यंत संक्रमक विषाणूजन्य आजाराची पुष्टी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हाय सिक्युरिटी ॲनिमल डिजीज, भोपाल येथे पाठवलेल्या नमुन्यांमध्ये झाली. या प्रकरणामुळे राज्यातील संबंधित सरकारी विभागांनी तातडीने इमरजन्सी प्रतिबंधक उपाययोजना सुरू केल्या आहेत.

### आरोग्य यंत्रणा सतर्क

अलाप्पुझा जिल्ह्यात आठ पंचायतांच्या वॉर्डांमध्ये प्रकोपाची माहिती मिळाली असून नेदुमुडी, चेरुथाना, करुवट्टा, कार्तिकपल्ली, अंबलप्पुझा साउथ, पुन्नाप्रा साउथ, थाकाझी आणि पुरक्कड या भागाँत रोग पसरला आहे. नेदुमुडीमध्ये मुख्यत्वे पोल्ट्री पक्षी प्रभावित झाले, तर इतर भागात बत्तखांमध्ये संसर्गाची नोंद झाली आहे. या भागातील बत्तख पालन हे अनेक शेतकऱ्यांसाठी आजीविकेचा महत्त्वाचा स्रोत असल्याने परिस्थिती गंभीर ठरत आहे.

कोट्टायम जिल्ह्यातही चार वॉर्डांमध्ये, म्हणजे कुरुपंथारा, मंजूर, कल्लूपुरायक्कल आणि वेलूर येथे एवियन इन्फ्लूएंजाचे प्रमाण आढळले आहे. येथे बटेर आणि मुर्ग्यांमध्ये रोगाची पुष्टी झाली असून पशुपालन विभागाने त्वरित निगराणी व बायोसिक्युरिटी प्रोटोकॉल कडक केली आहे.